दि. २८।१२।२२.

① महाराष्ट्र टाईम्स पान नं. ०१

# मुख्यमंत्री 'सशर्त' कक्षेत!

## चौकशीसाठी लोकायुक्तांना घ्यावी लागणार विधानसभेची पूर्वपरवानगी

मटा विशेष

Sanjay.vhanmane
@timesgroup.com
Tweet :@sanjayvMT




### चौकशीचे अधिकार कुणाला?

विधेयकाच्या मसुद्यानुसार मंत्र्यांविरोधातील चौकशीसाठी राज्यपालांची, विधान परिषदेच्या सदस्यांबाबत सभापती आणि विधानसभा सदस्यांच्या चौकशीला परवानगी देण्याचे अधिकार हे विधानसभा अध्यक्षांना देण्यात आले आहेत. प्रशासकीय, पोलिस आणि वन सेवेतील अधिकाऱ्यांविरोधात असलेल्या भ्रष्टाचाराच्या तक्रारींची चौकशी करण्यास परवानगी देण्याचा अधिकार मुख्यमंत्र्यांकडे असेल. अन्य अधिकाऱ्यांसंदर्भात चौकशीला परवानगी देण्याचा अधिकार संबंधित मंत्र्यांना देण्यात आला आहे.

नागपूर : विद्यमान किंवा माजी मुख्यमंत्र्यांविरोधातील भ्रष्टाचाराच्या आरोपांची चौकशी सुरू करण्यापूर्वी लोकायुक्तांना विधानसभेची पूर्वपरवानगी घ्यावी लागणार असल्याची तरतूद प्रस्तावित नव्या लोकायुक्त विधेयकात करण्यात आली आहे. याबाबतचा प्रस्ताव विधानसभा अधिवेशनात मांडताना सभागृहाच्या एकूण सदस्य संख्येच्या दोनतृतीयांश सदस्यांद्वारे संमत करावा लागेल, असेही नमूद आहे. या तरतुदीमुळे मुख्यमंत्र्यांविरोधात चौकशीला परवानगी द्यायची किंवा नाकारायची, याचे अधिकार राज्य सरकारकडेच राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित मंत्रिमंडळ बैठकीत केंद्राच्या लोकपाल कायद्याच्या धर्तीवर राज्यात नवीन लोकायुक्त कायदा करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या कायद्याच्या कक्षेत विद्यमान मुख्यमंत्री, माजी मुख्यमंत्री तसेच मंत्री यांचा समावेश असेल. भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा हा नवीन लोकायुक्त कायद्याचा भाग राहील आणि यासंदर्भातील विधेयक हिवाळी अधिवेशनात मांडण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली होती. त्यानुसार शुक्रवारी विधानसभेच्या कामकाज पत्रिकेत महाराष्ट्र लोकायुक्त विधेयक दाखविण्यात आले होते. मात्र, भाजप आमदार मुक्ता टिळक यांना श्रद्धांजली वाहून विधानसभेचे कामकाज आज दिवसभरासाठी स्थगित करण्यात आल्याने हे विधेयक चर्चेला येऊ शकले नाही.

### लोकायुक्त समितीत कोण?

लोकायुक्त म्हणून उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालयाचे किंवा मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून काम केलेल्या व्यक्तीची निवड केली जाईल. या लोकायुक्त समितीमध्ये चार सदस्यांचा समावेश असेल. त्यापैकी दोघे न्यायिक सदस्य असतील. उच्च न्यायालयाचे आजी-माजी न्यायाधीश हे न्यायिक सदस्यपदासाठी पात्र असतील. परंतु, अशी व्यक्ती उपलब्ध नसेल तर जी व्यक्ती प्रमुख जिल्हा न्यायाधीशांपेक्षा कमी दर्जा नसलेली न्यायाधीश आहे किंवा काम केले आहे, अशा व्यक्तींची न्यायिक सदस्य म्हणून नियुक्ती करता येईल. तर भ्रष्टाचार विरोधातील धोरणे, लोकप्रशासन, दक्षता, विमा, बँक व्यवसाय यासह वित्त, कायदा आणि वित्तीय व्यवस्थापन (पान १२वर)

पान नं. १२.

# मुख्यमंत्री 'सशर्त' कक्षेत!

(पान एकवरून)

यांच्याशी संबंधित असणाऱ्या बाबींमधील विशेष ज्ञान आणि किमान २५ वर्षे अनुभव असलेली संशयातीत सचोटी आणि उत्कृष्ट क्षमता असलेली व्यक्ती न्यायिक सदस्यांव्यतिरिक्त अन्य सदस्य म्हणून नियुक्त करण्यास पात्र राहील.

### शिफारस कोण करणार?

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील निवड समिती राज्यपालांना लोकायुक्त आणि इतर चार सदस्यांच्या नावाची शिफारस करेल. उपमुख्यमंत्री हे या समितीचे उपाध्यक्ष असतील. समितीत विधान परिषदेचे सभापती, विधानसभा अध्यक्ष, विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाचे विरोधी पक्षनेते तसेच मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेले मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश असतील. ही निवड समिती लोकायुक्तांच्या अध्यक्षांची आणि सदस्यांची निवड करण्यासाठी तिची स्वतःची कार्यपद्धती नियमित करेल. लोकायुक्त आणि सदस्यांची मुदत ही पदग्रहणापासून पाच वर्षे किंवा संबंधित व्यक्तीचे ७० वर्षे वय पूर्ण होईपर्यंत असेल.

### अपमान केल्यास शिक्षा

लोकायुक्त किंवा सदस्य यांचा जाणीवपूर्वक अपमान करणे अथवा त्यांच्या कामात अडथळा आणणे, अपकिर्ती करणे, यांसाठी संबंधित व्यक्तीवर दोष सिद्ध झाल्यास त्याला सहा महिन्यांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाची शिक्षा किंवा दंडद्रव्य अथवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात, असे विधेयकात म्हटले आहे.

दि. २४।१२।२२.

② म. टा. पान नं. ०१

# उद्धव यांच्या 'फोन'ची चौकशी

म. टा. वृत्तसेवा, नागपूर



अमरावती येथील व्यावसायिक उमेश कोल्हे हत्या प्रकरणात तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पोलिसांना चोरीचे प्रकरण म्हणून तपास करण्याचे आदेश दिले असतील तर त्यांच्या फोनकॉलची चौकशी करण्यात येईल, अशी माहिती प्रभारीमंत्री शंभूराज देसाई यांनी शुक्रवारी विधानसभेत दिली.

भाजपचे आमदार राम सातपुते यांनी विधानसभेत अहमदनगर जिल्ह्यातील धर्मांतराबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती. या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेत सहभागी होताना अमरावतीचे आमदार रवी राणा यांनी उमेश कोल्हे हत्या प्रकरणाचा मुद्दा उपस्थित केला. 'ठाकरे यांनी एका काँग्रेस नेत्याच्या सांगण्यावरून हा तपास चोरीच्या दिशेने करण्यास सांगितले. खासदार नवनीत राणा आणि मी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे तक्रार करून राज्याचे मुख्यमंत्री प्रकरण (पान १२वर)

## कोल्हे हत्या प्रकरण; शंभूराज देसाई यांची माहिती

### निरीक्षकाची चौकशी

नगर जिल्ह्यातील धर्मांतराला संरक्षण देत असल्याचा आरोप असलेले राहुरीचे पोलिस निरीक्षक प्रताप दराडे यांची अतिरिक्त पोलिस अधीक्षकांमार्फत चौकशी करण्याची आणि त्यांची बदली पोलिस नियंत्रण कक्षात करण्यात येत असल्याची घोषणाही देसाई यांनी केली.

### विरोधकांचा बहिष्कार

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना उद्देशून असंसदीय सदस्य शब्द वापरल्याचा ठपका ठेवत राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जयंत पाटील यांच्यावर करण्यात आलेल्या निलंबनाच्या कारवाईच्या निषेधार्थ आघाडीच्या आमदारांनी शुक्रवारी विधानसभेच्या कामकाजावर बहिष्कार टाकला. त्यानंतर विधानभवनाच्या पायऱ्यांवर अभिरूप विधानसभा भरवत विरोधकांनी शिंदे सरकारविरोधात आंदोलन केले. यावेळी घोषणाबाजीही करण्यात आली. ➤ वृत्त... ५

पान नं. १२.

# उद्धव यांच्या 'फोन'ची चौकशी



(पान एकवरून)

दाबण्याचा प्रयत्न करत असल्याचे सांगितले होते. त्यावर शहा यांनी हा तपास एनआयएकडे तपास सोपवला होता. तेव्हा, नुपूर शर्माच्या समर्थनार्थ हिंदुत्वाच्या बाजूने पोस्ट केल्याने भरचौकात कोल्हे यांची हत्या केल्याचं स्पष्ट झाले', असे राणा म्हणाले. या प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करण्याची मागणीही त्यांनी केली. त्यावर शंभूराज देसाई यांनी राज्य गुप्तचर विभागाचा अहवाल आल्यानंतर योग्य निर्णय घेतला जाईल आणि उद्धव ठाकरे यांच्या फोनकॉलची चौकशी केली जाईल, असे जाहीर केले.

दि. २३/१२/२२.

③ म.टा. पु. पान नं. ०७

# वसईत रविवारी ख्रिसमस कार्निव्हल

म. टा. वृत्तसेवा, वसई

नाताळ सणानिमित्त गोव्याच्या धर्तीवर वसईतही ख्रिसमस कार्निव्हलचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या रविवारी, २५ डिसेंबर रोजी रमेदीतील घोगळेवाडी येथून कार्निव्हल मिरवणूक प्रस्थान करणार आहे. यावेळी संस्कृती, परंपरांचे, सामाजिक जागृतीचे दर्शन नागरिकांना होणार असून या सर्वधर्मीय शोभायात्रेचे वसईकरांना औत्सुक्य आहे.

वसईच्या नाताळची आधी अनेकविध वैशिष्ट्ये सांगितली जायची. मात्र आता सर्वांत अग्रभागी उंट, हत्ती आणि घोड्यांच्या सहभागाने भरविल्या जाणाऱ्या, पारंपरिक वेशभूषेत अबालवृद्धांचा उत्साही सहभाग असणारा, तसेच अनेक सामाजिक जनजागृतीचा पुरस्कार करणारा हा कार्निवल उपक्रम वसईत लक्षवेधी ठरत आहे. येत्या रविवारी दुपारी २ वाजता या कार्निव्हल मिरवणुकीचा शुभारंभ होणार असून या वेळी विजय पाटील फाऊंडेशनचे अध्यक्ष विजय पाटील, घोगळेवाडी गाव मंडळ अध्यक्ष नेव्हील डिसोजा, कार्निवल मिरवणुकीचे प्रणेते सुनील डिमेलो यांसह इतर उपस्थित राहणार आहेत. तसेच, जनजागृती, सामाजिक प्रबोधनाचे देखावे आकर्षकरीत्या या मिरवणुकीतून पाहायला मिळणार आहेत. या मिरवणुकीला सर्वधर्मीय स्वरूप आणि स्थानीय संस्कृती, परंपरा यांच्या संवर्धनाची जोड मिळणार आहे.

२०१३मध्ये पहिली कार्निवल मिरवणूक वसईत काढण्यात आली. जी प्रचंड गाजली अणि सर्वांच्या लक्षात राहिली. त्यामुळे दरवर्षी या कार्निव्हलचे आयोजन करण्यात येते. करोनामुळे दोन वर्षे मिरवणूक काढता आली नसल्याने यंदा मोठ्या प्रमाणात कार्निव्हलचे आयोजन केले असून सर्वांनी उत्साहात त्यात सहभागी व्हावे, असे आवाहन कार्निव्हल समितीचे अध्यक्ष रॅन्डोल डिमेलो यांनी केले आहे. कार्निव्हलला घोगळेवाडी, रमेदी येथून सुरुवात होणार असून, पुढे होळीमार्गे आक्टन, बंगली, पापडी नाका गाठून तेथून तामतलाव, पारनाका (वसई), मिलागरी क्रॉस अणि सायंकाळी ७ वाजता मिरवणूक घोगळे गावात पोहोचून तिचा समारोप होईल.

④ म.टा. पु. पान नं. ०७ ⑤

# अर्नाळा किनारी माशांचा खच

म. टा. वृत्तसेवा, वसई

विरारच्या अर्नाळा समुद्र किनारी चक्क जिवंत तारली माशांचा खच गुरुवारी दिसून आला. येथील संपूर्ण समुद्र किनाऱ्यावर काही तारली मासे तडफडताना तर काही उड्या मारताना दिसत होते. तर, काही मासे मृतावस्थेत आढळून आल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

अर्नाळा किनारी तारली मासे उड्या मारताना पाहून येथील मच्छिमारांची एकच धावपळ उडाली होती. कोणी जाळी घेऊन तर कोणी टोपले घेऊन, तर कोणी हाताने मासे पकडण्यासाठी धावत होते. अनेकांनी हे दृश्य मोबाइलमध्येही कैद केले. मात्र अचानक समुद्र किनाऱ्यावर हे मासे कसे आले, याबाबत नीटसे कळू शकलेले नाही. तसेच, समुद्रात रसायन किंवा तेल टाकल्याने जीव वाचविण्यासाठी समुद्र किनाऱ्यावर हे मासे आले असावेत, असा अंदाज मच्छिमारांकडून वर्तविण्यात येत आहे.

# कारवाईच्या इशाऱ्याने कंत्राटदाराची शरणागती

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

**कचऱ्यावरील प्रक्रिया पुन्हा सुरू**

भाईंदरच्या उत्तन कचरा प्रकल्पातील कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे बंद करण्यात आलेले काम पुन्हा सुरू करण्यात आले आहे. या कामाचे मागील काही महिन्यांचे देयक थकल्याने प्रशासनाला वेठीस धरण्याची भूमिका घेत, कंत्राटदाराने गुरुवारी काम थांबवले होते. त्यामुळे पालिका प्रशासनाने कंत्राटदराला नोटीस बजावत कारवाईचा इशारा दिला होता. अखेर कंत्राटदाराने शरणागती पत्करत गुरुवारी पुन्हा काम सुरू केले आहे.

उत्तन धावगी डोंगर येथील कचरा प्रकल्पात शहरात तयार होणारा दैनंदिन कचरा टाकला जातो. या कचऱ्यावर प्रक्रिया करत त्याची विल्हेवाट लावण्यासाठी एका खासगी कंपनीची कंत्राटी स्वरूपात नियुक्ती केली आहे. या कामाचे कंत्राटदाराचे मागील काही महिन्यांचे सुमारे दीड कोटी रुपयांचे देयक पालिकेने थकवले होते. गुरुवारी सकाळी प्रकल्पात कचराप्रक्रियेचे काम बंद केले होते. प्रकल्पात कचरा घेऊन आलेल्या गाड्यांनाही प्रवेश दिला जात नसल्याने, त्यांच्या रांगा लागल्या होत्या. काही ठिकाणचा कचरा हा सायंकाळपर्यंत उचलण्यात आला नव्हता. या पार्श्वभूमीवर पालिका मुख्यालयात वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पार पडलेल्या बैठकीनंतर कंत्राटदाराला नोटीस बजावत कारवाईचा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला होता. त्यानंतर गुरुवारी रात्री उशिरा कचऱ्याने भरलेल्या काही वाहनांना प्रकल्पात प्रवेश देत ती रिकामी करण्यात आली. त्यानंतर कचऱ्यावर प्रक्रिया करण्याची कार्यवाही सुरू झाली.

दि. २७/१२/२२

(६) लोकसत्ता पान नं. ४

# वसईमध्ये मद्यविक्रीत कोट्यवधींची उलाढाल

## मागणीत १७ टक्क्यांनी वाढ ; नाताळ, नववर्ष स्वागताची जय्यत तयारी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** करोनाच्या दोन वर्षांच्या निर्बंधानंतर यंदा प्रथमच नाताळ आणि नववर्षाचे स्वागत होणार आहे. यासाठी जंगी मेजवान्यांचे आयोजन करण्यात येत असून हॉटेल, रिसॉर्ट सज्ज झाले आहे. नाताळ आणि नवीन वर्षाच्या स्वागतासाठी होणाऱ्या मेजवान्यांमध्ये मोठ्या प्रमाणात मद्याची विक्री होत असते. चालू वर्षात मद्याच्या मागणीत १७ टक्क्यांची वाढ झाल्याचे दिसून आली आहे. यामुळे मद्य बाजारातील उलाढाल ३९० दशलक्षांवर गेली असून २०१९च्या तुलनेत उलाढाल चार कोटींनी वाढली आहे.

रविवारपासून नाताळचा सण सुरू होत असून त्यानिमित्ताने विविध मेजवान्यांचे आयोजन करण्यात येत असते. नवीन वर्षाच्या स्वागतापर्यंत या मेजवाण्या सुरू असतात. यंदा २४ ते ३१ डिसेंबरपर्यंत सर्व रिसॉर्टस, पब, कल्ब्स, बँक्विट्स यांची नोंद झालेली आहेत. मेजवान्यांमध्ये मद्याची मागणी मोठ्या प्रमाणात असते. तसेच घरगुती, कार्यालयीन मेजवान्यांचा यात समावेश असतो. २०२२ या वर्षात मद्याच्या मागणीत १५ टक्क्यांची वाढ दिसून आली आहे, तर डिसेंबर महिन्यापासून बीटूबीमध्ये (बिझनेस टू बिझनेस सर्व्हिस) मध्ये आणखी १७ टक्क्यांची वाढ झाली आहे. विशेष म्हणजे या मागणीत १२ टक्के मागणी ही प्री-मिक्स अल्कोहोल, कॅण्ड वाईन, कॅण्ड बीअर सोबत कॅण्ड कॉकटेल व्हिस्की आदींचा आहे. यामुळे अल्कोहोल उत्पादकांना दुपटीने उत्पादन करण्यात येत आहे, असे प्राइम कॅन ॲल्कचे उत्पादक व्यवस्थापक शशांक दसोनी यांनी सांगितले.

नाताळ आणि नववर्षासाठी काही काळापुरती मर्यादित असलेली मागणी ही केवळ कॉकटेल प्री-मिक्स आणि कॅण्डसह फ्रूड फ्लेवर्ड अल्कोहोल, बीअर आणि रम यांना अधिक आहे. तर व्हिस्की, ब्रॅण्डी, जीन, व्होडका आदींच्या मागणीत घट नसून १५ टक्के वाढलेली मागणी डिसेंबर महिन्यातही स्थिर आहे. याचाच अर्थ ही मागणी वाढून मद्य बाजार ३९० दशलक्षांवर गेला आहे, म्हणजे २०१९च्या तुलनेत बाजार चार कोटींनी वाढले आहे, दसोनी यांनी माहिती दिली.

### कॉकटेल मद्याला पसंती

नाताळ आणि नववर्ष पार्टीसाठी फ्रूट फ्लेवर्ड अल्कोहोलमध्ये पीच, रोज, लिची, पेरू आदी फ्लेवर्सना जास्त मागणी आहे. तसेच बारटेंडरची संख्या कमी असल्याने अनेक पार्टीमध्ये बारटेंडर भेटत नाहीत त्यामुळे प्री मिक्स आणि कॅण्ड कॉकटेल मद्याला पसंती दिली जात आहे. प्री-मिक्समध्ये कॉकटेल फ्रूड ज्युस किंवा कॉन्सट्रेडेट पल्पमध्ये व्हिस्की, व्होडका एकत्र करून अल्कोहोल कॉकटेल बनवले जाते. तर कॅण्डमध्ये थेड वाइन किंवा बीअरप्रमाणे थेट मिक्स कॉकटेल असते. अशाप्रकारच्या कॅण्ड अल्कोहोलला मोठी मागणी, मात्र अशाप्रकारचे कॅण्ड व्हिस्की कॉकटेल उत्पादक कंपन्या कमी आहेत. व्हिस्की किंवा व्होडकाच्या कॉकटेलमध्ये ग्वावामेरी स्पाईस्ड कॉकटेल खूपच लोकप्रिय आहे. ज्यामुळे सध्या पेरू सिरपच्या मागणीत ३० टक्क्यांची वाढ झालेली आहे. तर कोकोनट वॉटर पावडरमध्ये १२ टक्क्यांची वाढ झाली आहे, कारण व्होडका आणि जीनमध्ये कोकोनट वॉटर मिसळले जाते ज्याला कोको कॉकटेल म्हणतात. यासह लेमनग्रास माईल्ड व्हिस्कीमधून दिले जाते, हे कॉकटेलचा नवीन ट्रेंड आला आहे, अशी माहिती केबी मार्केटिंग एजन्सीचे संचालक कूलभूषण भाटिया यांनी दिली.

दि. २८/१२/२१

(७) लोकसत्ता पृ.पान नं.९५.

# विरारमध्ये फेरीवाल्यांच्या दुहेरी रांगा

## नागरिकांना ये-जा करण्यास अडचणी

**लोकसत्ता वार्ताहर**



**वसई:** विरार पश्चिमेच्या विठ्ठल मंदिर परिसराच्या भागात फेरीवाल्यांनी अतिक्रमण केले आहे. या परिसरात आता चक्क फेरीवाल्यांच्या दुहेरी रांगा लावल्या जात असून रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या प्रवाशांना याचा मोठा फटका बसू लागला आहे.

वसई विरार शहरातील विविध ठिकाणच्या भागातील पदपथावर, रस्त्यावर, रस्त्याच्या कडेला फेरीवाल्यांचे अतिक्रमण सुरूच आहे. दिवसेंदिवस फेरीवाल्यांची समस्या अधिकच जटिल बनू लागली आहे. आता तर फेरीवाल्यांच्या समोर आणखीन दुसरे फेरीवाले आणून बसविण्याचे प्रकार घडत आहेत. त्यामुळे फेरीवाल्यांच्या दुहेरी रांगा तयार झाल्या आहेत.

विरार पश्चिमेच्या विठ्ठल मंदिर परिसराच्या रस्त्यावरून दररोज नागरिकांची मोठी वर्दळ सुरू असते. याच रस्त्यावर मोठ्या फेरीवाल्यांनी अतिक्रमण करून आपली दुकाने थाटली आहेत. आधीच पायी प्रवास करण्यासाठी असलेले पदपथ हे फेरीवाल्यांनी गिळंकृत केले होते. त्यामुळे नागरिकांना रस्त्यावरून ये-जा करावी लागत होती. आता तर चक्क रस्त्यावरही फेरीवाले बसू लागले आहेत. या फेरीवाल्यांच्या दुहेरी रांगांमुळे नागरिकांना प्रवास करताना मोठ्या अडचणी येत आहेत.

विशेषतः सकाळ-संध्याकाळ कामगार वर्गाची मोठी गर्दी विरार स्थानकाकडे ये-जा करण्यासाठी होत असते अशा वेळेत या फेरीवाल्यांच्या विळख्यातून वाट काढणे ही नागरिकांना कठीण झाले असल्याने नागरिकांनी सांगितले आहे. आधीच अपुऱ्या रस्त्यांमुळे वाहतूक कोंडी निर्माण होत आहे त्यातच फेरीवाले मोठ्या प्रमाणावर झाल्याने रस्ता अरुंद होऊन वाहतूक कोंडीच्या समस्या निर्माण होत आहेत.

पालिकेकडून या प्रकाराकडे दुर्लक्ष होत असल्याने दिवसेंदिवस असे प्रकार वाढीस लागले असल्याची प्रतिक्रिया नागरिकांनी दिली आहे.

पालिकेने याकडे लक्ष देऊन रस्त्यावर प्रवाशांची वाट अडवून धरणाऱ्या फेरीवाल्यांविरोधात कारवाई करावी, अशी मागणी जोर धरीत आहे.

(८) लोकसत्ता पृ.पान नं.९५

# घरामध्येच बेकायदा प्राणीसंग्रहालय

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



**वसई :** नालासोपारा येथील एका घरातून वनविभागाने अनेक दुर्मीळ प्रजातीचे प्राणी जप्त केले आहे. त्यात तीन सफेद साप, ४० विंचू, कासव, सरडे, पाली यांचा समावेश आहे. याप्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

नालासोपारा पूर्वेच्या डॉन लेनमधील एका घरात अत्यंत दुर्मीळ प्रजातीचे प्राणी लपवून ठेवण्यात आल्याची माहिती वनविभागाला मिळाली होती. घरावर छापा टाकून विविध प्रकारचे प्राणी जप्त केले आहे. यामध्ये दुर्मीळ सफेद साप, ४० विंचू, पाली, सरडे, कोळी कीटक, कासव यांचा समावेश आहे. याप्रकरणी वनविभागाने अझीम खान (२६) याला अटक केली आहे. हे प्राणी कुठून आणले आणि कुणाला विक्री करणार होता त्याचा तपास सुरू आहे. अशा प्रकारच्या दुर्मीळ वन्य प्राण्यांची मोठ्या प्रमाणावर तस्करी होत असून त्यात आंतरराज्य टोळीचा सहभाग असण्याची शक्यता आहे. आरोपीविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले असून त्याला दोन दिवसांची कोठडी देण्यात आली आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत देशमुख यांच्या पथकाने ही कारवाई केली.

③ लोकसत्ता पान नं. १२

दि. २४/१२/२२

# नाताळसाठी परदेशातील तरुण मायदेशी

लोकसत्ता प्रतिनिधी

**विरार :** वसई, विरारमध्ये नाताळची जय्यत तयारी सुरू असताना करोनाकाळात परदेशात असलेल्या तरुणांना भारतात येण्याची संधी न मिळाल्याने या वर्षी हे तरुण नाताळच्या निमित्ताने घरी परत येत असल्याने या वर्षीच्या नाताळ सणाचे महत्त्व वाढले आहे. यामुळे वसईतील ख्रिस्ती बांधवांत अधिक उत्साह आहे.

वसईतील नाताळ सण संपुर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. दरवर्षी हजारो नागरिक वसईत भेट देतात. पण करोनाकाळात मागील दोन वर्षांत शासनाकडून वेगवेगळे निर्बंध लादल्याने तसेच प्रत्येक देशात वेगवेगळे निर्बंध आणि नियम असल्याने अनेक तरुणांना देशात येता आले नाही. यामुळे या वर्षी करोना महामारीचे सर्व निर्बंध शिथिल केल्याने, अनेक तरुणांचे घरवापसीचे मार्ग मोकळे झाले आहेत. त्यात नाताळ सण असल्याने हा आनंद वाढला आहे. वसईच्या पूर्वपट्टीत बहुतांश तरुण हे नोकरी कामधंद्यानिमित्त परदेशात आहेत. यातील अनेक तरुण ज्या देशात आहेत त्यांना त्या देशातील नियमांमुळे परत घरी येता आले नव्हते. पण आता बहुतांश देशातील विमानसेवा सुरू झाल्याने तरुण नाताळ सण साजरा करण्यासाठी वसईत दाखल होत आहेत.

१० लोकसत्ता पान नं. ४५.

# घरफोडीतील दोन आरोपी अटकेत

लोकसत्ता वार्ताहर

**भाईंदर :** घरफोडी करून पसार झालेल्या दोन गुन्हेगारांना काशिमीरा गुन्हे शाखेंनी कुर्ला येथे सापळा रचून अटक केली आहे. आरोपींकडून ४ लाख ६३ हजार इतका मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

भाईंदर पूर्वेला राहणारे सिद्धेश कांबळी हे कुटुंबीयांसह बाहेर गेले असता त्यांच्या घरातील ऐवज चोरीस गेला. या प्रकरणाची नवघर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली होती. त्यानंतर घटनास्थळावरील तांत्रिक माहिती व पुराव्यांच्या आधारे काशिमिरा गुन्हे शाखे १ च्या पोलिसांनी तपास सुरू केला असता दोन आरोपी कुर्ला परिसरात लपल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलीस पथकाने सापळा रचून कमरुद्दीन शेख आणि आसिफ हुसेन यांना अटक केली. त्यांच्याकडून घरफोडीतील ४ लाख ६३ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. या आरोपींवर मुंबई येथे १२ गुन्हे दाखल आहेत.

११



# राज्य सरकारच्या विरोधात वसई येथे धडक मोर्चा

लोकसत्ता प्रतिनिधी

**विरार :** वसईत शुक्रवारी फुले, शाहू, आंबेडकर मंच यांच्या वतीने शिंदे- फडवणीस सरकारच्या विरोधात वसई पोलीस उपायुक्त यांच्या कार्यालयावर जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळीं सर्व पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सामील झाले होते.

गेले काही दिवस भाजप आणि शिंदे गटातील काही नेत्यांनी महापुरुषांबद्दल केलेल्या अपमानास्पद वक्तव्याचा निषेध करण्यासाठी या मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. ज्या नेत्यांनी महापुरुषांच्या विरोधात वक्तव्य केले अशा नेत्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी मंचच्या वतीने करण्यात आली होती. यासाठी नालासोपारा वसंत नगरीतील उपायुक्त पोलीस कार्यालयावर शेकडोच्या कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत राज्य सरकारच्या विरोधात आणि नेत्यांच्या विरोधात निदर्शने करून घोषणाबाजी करण्यात आली.

दि. २७/१२/२२.

(१२) लोकसत्ता पान नं. ७५.

# कला-क्रीडा महोत्सवात यंदा ६० हजार स्पर्धक

## वसईत ३१ वा कला-क्रीडा महोत्सव रंगणार

**लोकसत्ता वार्ताहर**



**वसई :** वसईत ३१ वा कला-क्रीडा महोत्सव रंगणार आहे. या कला-क्रीडा महोत्सवातील विविध क्रीडा व कला प्रकारांत सुमारे ६० हजार स्पर्धक सहभागी होणार आहेत.

यंग स्टार ट्रस्ट विरार पुरस्कृत वसई-विरार महापालिका व वसई तालुका कला-क्रीडा विकास मंडळ यांच्या वतीने नरवीर चिमाजी आप्पा मैदान येथे दरवर्षी २६ डिसेंबर ते ३१ डिसेंबर या दरम्यान आयोजित केला जात असतो. तरुणाईच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी या स्पर्धेचे आयोजन केले जात आहे. यंदाचा हा ३१ वा कलाक्रीडा महोत्सव आहे. दोन वर्षे करोनामुळे हा महोत्सव झाला नसल्याने यंदाचा महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडणार आहे.

महोत्सवाचे उद्घाटन सुप्रसिद्ध ज्येष्ठ नाट्य-सिनेअभिनेते पद्मश्री मनोज जोशी व प्रसिद्ध रणजी क्रिकेटपटू सर्फराज खान यांच्या हस्ते होणार होणार आहे.

तर या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थान यंग स्टार ट्रस्टचे अध्यक्ष आमदार हितेंद्र ठाकूर हे भूषविणार आहेत.

या प्रसंगी पालिकेचे आयुक्त अनिलकुमार पवार, आमदार क्षितिज ठाकूर व राजेश पाटील, माजी महापौर राजीव पाटील, प्रवीणा ठाकूर, नारायण मानकर, रुपेश जाधव, प्रवीण शेट्टी यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या कला क्रीडा महोत्सवात ६९ विविध प्रकारच्या स्पर्धा होणार असून यात नृत्य, वैयक्तिक मैदानी स्पर्धा, पुष्परचना स्पर्धा, कबड्डी, खो खो, रांगोळी, ज्येष्ठ नागरिक कलाविष्कार, बॉक्सिंग, वेशभूषा, पाककला, लोकनृत्य, शरीरसौष्ठव, भजन, नाट्य अभिनय, वादविवाद, शूटिंग बॉल, कराटे, टेबल टेनिस, बास्केटबॉल, जलतरण, एकांकिका अशा विविध स्पर्धांचा समावेश आहे.

(१३) पुढारी पृ. पान क्र. ०१.

# दुकानांवर मराठी भाषेतील पाट्या लावाव्यात अन्यथा परवाना करणार रद्द ; आयुक्तांचे आदेश

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**




राज्य शासनाने राज्यात मराठी भाषा अनिवार्य केल्यानंतर सर्व आस्थापना, दुकानांवरील पाट्या मराठी भाषेतच असाव्यात, याअनुषंगाने शासनाकडून मराठी पाट्या सक्तीच्या करण्यात आल्या आहेत. मात्र शासनाने २०२२ मधील सुधारणा अधिनियमांतर्गत महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवा शर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ मध्ये नव्याने तरतूदी केल्या आहेत. त्यानुसार मिरा-भाईंदर शहरातील मराठी पाट्यांसंदर्भात पालिकेने केलेल्या कार्यवाहीचा सद्य:स्थितीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश राज्य शासनाच्या नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने पालिकेला ९ मे रोजी पाठविलेल्या पत्राद्वारे दिले होते. यानंतर आयुक्तांनी शहरातील दुकानांवर मराठी भाषेतील पाट्या ७ दिवसांत लावण्याचे आदेश नुकतेच काढले असून तसे न करणाऱ्या दुकानांचा परवानाच रद्द करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

राज्यातील अमराठी पाट्यांविरोधात मनसे व मराठी एकीकरण समितीने वेळोवेळी आंदोलने छेडून मराठी भाषा सक्तीची करण्याची मागणी केली. मराठी भाषेला महाराष्ट्र राज्यातच दुय्यम दर्जा दिला जात असल्याने तीला राजभाषेचा दर्जा देण्यासह तीचा वापर सर्व शासकीय व प्रशासकीय कार्यालयांत अनिवार्य करण्यात यावा, या मागणीने मागील काही वर्षांत जोर धरला होता. त्याची दखल घेत तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्व शासकीय व प्रशासकीय कार्यालयांत मराठी भाषेची सक्ती केली. तसेच राज्यातील सर्व दुकाने व विविध आस्थापनांवरील पाट्या मराठी भाषेतच असाव्यात, अशी सक्ती करीत मराठी भाषेचा वापर न करणाऱ्यांविरोधात कारवाईचा बडगा उचलण्याचा इशारा दिला.

याविरोधात काही अमराठी व्यापाऱ्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. ती न्यायालयाने फेटाळल्यानंतर मराठी भाषेची सक्ती कायम राहिली असली तरी शासनाने महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवा शर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ मध्ये सुधारणा अधिनियम २०२२ नुसार मराठी पाट्यांबाबत काही सुधारणा व नव्याने तरतूदी केल्या. त्याअनुषंगाने पालिकेने केलेल्या कार्यवाहीचा सद्य:स्थितीतील अहवाल वा माहिती तात्काळ सादर करण्याचे निर्देश नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने मिरा-भाईंदर महापालिकेला ९ मे रोजी पाठविलेल्या पत्राद्वारे दिले. त्यात मराठी पाट्यांबाबतच्या नवीन धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी विधानभवनात साक्ष घेण्यात येणार असल्याचे नमुद करण्यात आले. हि कार्यवाही पार पडल्यानंतरही शहरातील काही दुकानांवर अमराठी पाट्या लावण्यात आल्याचे निदर्शनास येत आहे. पालिकेच्या २०१० मधील तत्कालिन महासभेत मराठी भाषेच्या वापराची सक्ती करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. त्याअनुषंगाने मनसेने पुढाकार घेत त्यावेळी दुकानांवरील अमराठी पाट्या हटविण्यास सुरुवात केली होती. यानंतर पाट्या हटविण्यात आल्या. कालांतराने परिस्थिती जैसे थेच आहे.

दि. २४/१२/२२

(१४) पुढारी पृ. क्र. ०२

# संविधानप्रेमींचा उपायुक्त कार्यालयावर मोर्चा

## महापुरुषांचा अवमान करणाऱ्यांविरोधात गुन्हे दाखल करा

**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा**

फुले, शाहू, आंबेडकर विचार मंच-वसई तालुका यांच्या माध्यमातून महापुरुषांबद्दल बेताल वक्तव्य करून अपमानित करण्याचे काम शिंदे-भाजप सरकारच्या निषेधार्थ पोलीस उपायुक्त कार्यालय नालासोपारा एव्हरशाईन या ठिकाणी धडक मोर्चा काढण्यात आला.



आंबेडकरी समाजातील युवकांना घरात घुसून मारण्याची धमकी देत चिथावणीखोर भाषा करणारे घाटकोपर विधानसभेचे आमदार राम कदम यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा, शाईफेक करणारे भीमसैनिक मनोज गरबडे यांच्यावर नाहक भा.दं.वि. संहिता ३०७ अन्वये खोटा गुन्हा दाखल करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवरही अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली. तसेच विरार पोलिसांविरोधात कारवाई करा आदी मागण्या पोलीस उपायुक्त सुहास बावचे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

(१५) पुण्यनगरी पृ. क्र. ०१

# मेट्रो कारशेड एस्सेल वर्ल्ड येथे उभारावे

**मीरा रोड** । मेट्रो कारशेड उत्तन येथील महसूल खात्याच्या जमिनीवर उभारण्याच्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या घोषणेचे मीरा-भाईंदर काँग्रेसने स्वागत केले आहे. राई, मोर्वा, मुर्धा येथील भूमिपुत्र, ग्रामस्थांना दिलासा मिळणार असला तरी आगामी काळात त्यांच्यासह उत्तनवासीयांवर अन्याय होणार नाही, याची काळजी घेण्याची मागणी काँग्रेस प्रवक्ते प्रकाश नागणे यांनी केली आहे. मेट्रो कारशेड उत्तनऐवजी ते पुढे गोराई एस्सेलवर्ल्डपर्यंत नेल्यास मेट्रो रेल्वे थेट बोरिवली मुंबईला जोडली जाईल, या आमच्या सुचनेचा विचार व्हावा, असे नागणे म्हणाले. काँग्रेस नेते माजी आमदार मुझफ्फर हुसैन यांनीदेखील स्थानिक भूमिपुत्रांचा विरोध लक्षात घेता नियोजित प्रारूप विकास आराखड्यात दर्शवण्यात आलेले मोर्वा-मुर्धा येथील मेट्रो कारशेडचे स्थलांतर करण्याची मागणी जोर लावून धरली होती. आम्ही नेहमीच आगरी, कोळी, शेतकरी, कष्टकरी, स्थानिक, भूमिपुत्रांच्या पाठीशी असून उत्तनसह सर्वांना सोयीचे व मेट्रो मुंबईला जोडली जावी, यासाठीच कारशेड गोराईला उभारण्याची मागणी करण्यात आल्याचे नागणे यांनी सांगितले.

लोकमत

# रूम खरेदीच्या नावाखाली फसवणूक

**नालासोपारा :** नालासोपाऱ्यात भाडेकरूकडून रूम खरेदी करण्याच्या नावाखाली फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. तुळींज टाकी रोड येथील कुमार काकडे (वय ४०) यांचा नालासोपारा वरद अपार्टमेंट येथील रूम १५ जानेवारी २०१५ पासून राजू सरदार व जयेश पवार यांनी भाड्याने राहण्यासाठी घेतला होता. त्यानंतर त्यांनी सदर रूम विकत घेतो, असे सांगत कुमार काकडे यांना तीन लाख रुपये रोख व प्रति महिना दहा हजार रुपये देण्याची मान्य केले होते. मात्र, त्यानंतर पैसे दरमहा न देता त्यांना विचारणा केल्यावर काकडे यांना शिवीगाळ करण्यात येत होती. आरोपी जयेश पवार याने खोटा करारनामा करून रूममध्ये स्वतःच्या नावाने विद्युत मीटर बसवून घेतले होते. तुळींज पोलिसांनी गुरुवारी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

Hello Vasai
Page No. 1 Dec 24, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

लोकमत इन्फोग्राफिक्स

# मोबाइलवर अनवाँटेड कॉल्स रोखायचे कसे?




मंगेश कराळे | लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : शहरातच नव्हे तर गावातही कोणाला तरी ऑनलाइन गंडा घातल्याचे ऐकिवात येते. कॉल कोण करते आहे, याची माहिती नसल्याने फसवणूक होते. आता सामान्य नागरिकांची या अशा फसवणुकीपासून सुटका होणार आहे. यासाठी डीएनडी ही सेवा आपल्या मोबाइलवर सुरु करा, अन निश्चित राहा. भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणाने क्रमांकासोबत नावाचा कॉलर आयडी आणण्याची व्यवस्था केली आहे.

## अनोळखी नंबरवरुन फसवणूक

फोन करणाऱ्या व्यक्तीने बँकेचा, कुठल्याही खात्याचा, कंपनीचा ऑफिसर असल्याचे सांगितले, तरीही 'ओटीपी' देऊ नये. यूपीआय पिन, एटीएम-डेबिट-क्रेडिट कार्ड यांचा पिन, तसेच सीव्हीव्ही (मागील बाजूस असलेला तीन आकडी कोड), बँक खाते क्रमांक कोणालाही देऊ नये. यूपीआयद्वारे पेमेंट करताना नाव 'व्हेरिफाय' आहे का, हे तपासून बघावे. यूपीआय पिन, क्यूआर कोड स्कॅन करणे हे पैसे देताना करावे लागते.

## टेलिकॉलर्स कॉल ब्लॉक करा

टेलिकॉलर्सकडून येणारे कॉल्स हे वेगवेगळ्या नंबरवरुन येत असतात. त्यामुळे कुठला नंबर ब्लॉक करायचा हेच समजत नाही; पण काही सोप्या पद्धतीचा वापर करुन तुम्ही हे कॉल्स ब्लॉक करु शकता. विविध नेटवर्कवर येणारे कॉल्स तुम्ही आता ब्लॉक करु शकता.



## अनेकांची फसवणूक

सुविधा मिळत असतानाच तंत्रज्ञानाचा गैरफायदा घेण्याचे प्रकारही वाढत आहेत. देशातील अनेक शहरांमध्ये ऑनलाइन फसवणुकीच्या शेकडो घटना घडत आहेत. पोलीस आयुक्तालयात ११ महिन्याच्या कालावधीत मोबाइलवरुन अनेकांची फसवणूक झाल्याचे गुन्हे दाखल आहेत.

## स्पॅम कॉल्सबद्दल

तीन प्रकारचे स्पॅम कॉल असतात. रिअल कंपनीकडून येणारे कॉल्स जे काही विकण्यासाठी कॉल करतात. रोबोटीक किंवा प्री रेकॉर्डिंग कॉल्स आणि तिसरे स्पॅम कॉल्स. जे तुमची फसवणूक करण्यासाठी करतात. ट्रायच्या नियमानुसार डीएनडी सुविधेचा साहाय्याने हे कॉल्स रोखू शकता.

## कॉल करुन ब्लॉग करण्याचा पर्याय

तुमच्या फोनवरुन १९०९ या क्रमांकावर कॉल करा. सूचना फॉलो करा. मग तुमच्या मोबाइल नंबरवर डीएनडी सुविधा सुरु होईल आणि नको असलेले कॉल्स तुम्हाला येणारच नाही.

## असा करा डीएनडी मेसेज

सर्वातआधी फोनमधील मेसेज ओपन करा. त्यानंतर क्रिएट मेसेजमध्ये जा, त्यामध्ये स्टार्ट (स्पेस) मोबाइल नंबर लिहा. मग हा मेसेज १९०९ या क्रमांकावर पाठवा.

Hello Vasai
Page No. 3 Dec 24, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

# कॉलेजच्या भिंतीवर बार-रेस्टॉरंटची जाहिरात

## तरुणाईला आकर्षित करण्याचे प्रयत्न?

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : शाळा व महाविद्यालय परिसरात १०० मीटरपर्यंत तंबाखूजन्य पदार्थ व मद्य विक्रीवर बंदी आहे. त्यावर उपाय व तरुणाईला मद्याकडे आकर्षित करण्यासाठी बार मालकांनी नवीन शक्कल शोधून काढली आहे. महापालिकेच्या आशीर्वादाने विरार पश्चिम येथील मोठ्या महाविद्यालय व माध्यमिक शाळा असलेल्या संकुलाच्या भिंतीवर १० फूट बाय ३० फूट लांबीचा बार आणि रेस्टॉरंटची जाहिरात करणारा बोर्ड गेल्या अनेक दिवसांपासून झळकत आहे.

वसईमधील दत्तानी मॉलमध्ये सुरू केलेल्या बारची जाहिरात थेट विरारच्या कॉलेजच्या बाहेर लावण्याच नेमका उद्देश काय? कॉलेजमधील तरुणाईला आकर्षित करण्यासाठीच तर हा प्रयत्न नाही ना, असे सवाल आता केले जात असून या जाहिरातीत बारमधील इतर विशेष सुविधांची सुद्धा माहिती दिली आहे. मुळात महापालिकेने या जाहिरातील परवानगी कशी दिली? कॉलेज प्रशासनाने यावर हरकत का घेतली नाही? असे अनेक प्रश्न यामधून निर्माण होत आहेत. यामुळे संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी भाजप जिल्हा उपाध्यक्ष मनोज पाटील यांनी महापालिका व अर्नाळा पोलिस ठाण्याकडे केली आहे.

Hello Vasai
Page No. 1 Dec 24, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

# दोन नायजेरियनवर पोलिसांची कारवाई

**नालासोपारा :** नायगावमध्ये अनधिकृतपणे राहणाऱ्या दोन नायजेरियन नागरिकांवर पोलिसांनी कारवाई केली आहे. नायगावच्या रश्मी पिंक सिटी व सिटिझन कारनेशन येथे राहणाऱ्या कायोडे अडिसा (वय ४७) व डरमोला एडीबोला (वय ३७) या दोन्ही नागरिकांना पोलिसांनी गुरुवारी संध्याकाळी सहाच्या सुमारास ताब्यात घेतले आहे. या दोन्ही नायजेरियन नागरिकांकडे भारतात राहण्यासाठी अधिकृत व्हिसा नसताना बनावट पासपोर्ट व व्हिसा बनवून ते नायगाव येथे वास्तव्य करत असल्याचे निदर्शनास आले आहे. याप्रकरणी दोन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

Mumbai Main
Page No. 7 Dec 24, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

न्यूज Inbox

# क्रिकेट अकादमीच्या नावाखाली फसवणूक

**नालासोपारा :** क्रिकेट अकादमीच्या नावाखाली नालासोपाऱ्यात एकाची लाखोंची फसवणूक करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. सेंट्रल पार्क येथे राहणाऱ्या सुरेश कुमार बिश्नोई (२३) या तरुणाला राहुल सिंह व अभिषेक सिंह यांनी १ सप्टेंबर २०२१ पासून प्रगतीनगर येथील एका भूखंडावर क्रिकेट टफ ग्राउंड अकादमी तयार करत ती पाच वर्षांकरिता चालविण्यासाठी देण्याच्या नावाखाली त्याच्याकडून चार लाख रुपये घेतले होते. मात्र, त्यानंतर आरोपींनी सदर भूखंडावर लग्नाचा हॉल बांधून तो तिसऱ्याच व्यक्तीला भाड्याने दिला होता. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येतात सुरेशकुमार बिष्णोई याने गुरुवारी तुळींज पोलिस ठाण्यात तक्रार देऊन फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. तुळींज पोलिस अधिक तपास करीत आहेत.

Hello Vasai
Page No. 1 Dec 24, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

# भरतीसाठी इंजेक्शनचा वापर; हृदयरोग, नपुंसकतेचा धोका!

## भावी पोलिसांनो सावधान : शरीरावर होतात घातक परिणाम

**मंगेश कराळे**

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : सध्या महाराष्ट्रात सैन्य दलात भरती सुरू आहे, तर पोलिस दलातही भरती प्रक्रिया राबवली जात आहे. भरतीसाठी काही तरुणांकडून मात्र शरीराचा स्टॅमिना वाढविण्यासाठी स्टेरॉइडचा मोठ्या प्रमाणात वापर झाल्याचे समोर आले आहे. असे इंजेक्शन शरीरावर दीर्घ काळासाठी घातक परिणाम करत असून, यामुळे हृदयरोग, वेगवेगळे संसर्ग, नपुंसकता यांसारख्या आजारांना निमंत्रण मिळत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

येत्या काही दिवसांत पोलिस दलात १८ हजारांपेक्षा अधिक कॉन्स्टेबलची भरती केली जाणार आहे. याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. भरतीसाठी आलेल्या काही उमेदवारांनी स्टेरॉइडसारख्या इंजेक्शनचा वापर केल्याचे समोर आल्याने येणाऱ्या भरतीतही असे प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र अशा इंजेक्शनमुळे तरुणांचे संपूर्ण आयुष्य उद्ध्वस्त होऊ शकते. यामुळे भावी पोलिसांनो, याबाबतीत काळजी घ्यावी, असे आवाहन केले जात आहे.

### हजारो युवक, युवतींनी केले ऑनलाइन अर्ज

- पोलिस भरती प्रक्रियेसाठी हजारो युवक, युवतींनी ऑनलाइन अर्ज दाखल केले आहेत.
- पात्र उमेदवारांना अर्ज दाखल करता येणार आहे. मुदतवाढीमुळे अर्जांचा पाऊस पडला आहे.



### सुदृढ शरीरासाठी इंजेक्शन कशाला?

सैन्यदल अथवा पोलिस भरतीत उमेदवारांना धावण्यासह इतर काही शारीरिक चाचण्या पार कराव्या लागतात. यासाठी काही तरुण स्टेरॉइडसारख्या औषधांचा वापर करतात. मात्र, शरीर सुदृढ असेल तर अशा इंजेक्शनची गरज नाही.

### पालकांनीही लक्ष देणे गरजेचे

जीमला जाणारे बहुतांश तरुण डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे घेतात. मात्र, आपला मुलगा काय करतोय, जीमला जात आहे तर तो कोणते औषध घेत आहे का? भरतीसाठी त्याने कोणते औषध मागवले आहे का? याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

### ऑनलाइन विक्री जोरात

शरीरासाठी घातक आणि उत्तेजक औषधांची ऑनलाइन विक्री जोरात सुरू आहे. तसेच अनेक मेडिकलमध्येही डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय अशी औषधे विकली जात आहेत. त्यामुळे तरुणांना अशी औषधे सहज उपलब्ध होत आहेत.

### हृदयरोगासह जीवघेण्य आजाराचे धोके

शरीरात तत्काळ जोश निर्माण करण स्टेरॉइडसारख्या औषधांचे अनेक घातक परिणाम समोर आले आहेत. उच्च रक्तदाब, नपुंसकता, शरीरात पाणी तयार होणे, मनस्थितीत बदल होणे, शुगर वाढणे, असे धोके असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

### दीर्घ काळासाठी परिणाम भोगावे लागतील

शरीर तंदुरुस्त आणि चांगली तयारी असेल तर सैन्य दल, पोलिस भरतीत जोश निर्माण करण्यासाठी स्टेरॉइडसारख्या घातक औषधे घेण्याची गरज नाही. या औषधामुळे उच्च रक्तदाब, उच्च रक्त शर्करा किंवा मधुमेह, अपचन यासह वेगवेगळे संसर्ग होण्याचा मोठा धोका असतो.

### शरीराला काय हवे याची पडताळणी हवी

बलदंड शरीरयष्टीसाठी केवळ फूड सप्लिमेंटची आवश्यकता नाही तर योग्य आहार हवा. आपल्या शरीराला काय योग्य, याची पडताळणी करूनच व्यायाम करावा.

**- डॉ. संदीप सरताळे**, नालासोपारा

Hello Vasai
Page No. 4 Dec 24, 2022
Powered by: erelego.com

पुढारी

# मारहाण करून रिक्षा चोरणाऱ्यांना अटक

## ६ गुन्ह्यांची उकल; मोबाईलसह २ लाखांचा मुद्देमाल जप्त

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत रिक्षा चोरी करुन पायी जाणाऱ्या इसमांना मारहाण करुन जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली आहे. या आरोपींकडून रोकड, घड्याळ, दोन ऑटो रिक्षा, वेगवेगळ्या कंपन्यांचे १६ मोबाईल फोन असा २ लाख ३५ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. हे आरोपी पोलिसांच्या हाती लागल्याने पेल्हार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ३ गुन्हे व वालीव पोलीस ठाणे हद्दीत २, डी. एन. नगर पोलीस ठाण्यात दाखल असलेला १ गुन्हा असे एकूण ६ गुन्हे उघडकीस आले आहेत.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत १८ डिसेंबर रोजी पहाटे साडे तीन च्या सुमारास अजित यादव हे त्यांचे राहते घरी जाण्यासाठी नालासोपारा फाटा येथून रिक्षाला हात करुन रिक्षामध्ये बसुन जात असतांना



पेल्हार , नालासोपारा येथे रिक्षा आली असता रिक्षात बसलेल्या व रिक्षा चालविणाऱ्या अशा तिन अनोळखी इसमांनी यादव यांना शिवीगाळ , दमदाटी करत मारहाण केली. व त्यांच्याकडील मोबाईल फोन, हातातील घडी व रोख रक्कम असा १४,००० रुपयाचा ऐवज जबरदस्तीने घेवून त्यांना चालत्या रिक्षातून ढकलून देवून पळून गेले होते. त्याबाबत अजित जंगबहादुर यादव यांनी दिलेल्या तक्रारीवरून तीन अनोळखी आरोपीवर पेल्हार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवून वरिष्ठ पोलीस अधिका-यांनी दिलेल्या सूचनांनुसार या गुन्हयातील रिक्षा व अनोळखी आरोपी यांचा तपास पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेने वेगवेगळी पथके तयार करुन आर-ोपी रवि गुप्ता (वय १९), विवेक राय (वय २२), अमित पासवान, (१९, सर्व रा. तुंगारफाटा, सातीवली) यांना अटक करण्यात आली.

Thane Edition
Dec 24, 2022 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# घरफोडीसह चेन स्नॅचिंग; आरोपी ताब्यात

## मिरारोड येथील कारवाईत साडेआठ लाखांचा मुद्देमाल जप्त

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

नवघर पोलीस ठाणे हद्दीत घरफोडी करणाऱ्या व सराईत सोनसाखळीचे गुन्हे करणाऱ्या आरोपींना गुन्हे शाखा कक्ष-१ यांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून ८ लाख ८३हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नवघर पोलीस ठाणे हद्दीत राहणारे सिध्देश सदाशिव कांबळी हे १७ डिसेंबर रोजी घर बंद करून त्यांचे कुटुंबासह शिर्डी येथे दर्शनासाठी गेले होते. त्यावेळी अज्ञात चोरट्याने घराचा टाळा तोडून घरातील ४, ७५,००० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने घरफोडी करून नेले होते. या घटनेबाबत नवघर पोलीस ठाण्यात भादंविसं. कलम ४५४, ४५७, ३८०, ५११ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्हयाचा गुन्हे शाखा युनिट १ यांनी तपास करून आरोपी कमरुद्दीन सलाउद्दीन शेख , आरीफ हुसैन खान दोन्ही रा. कुर्ला मुंबई या सराईत आरोपींना अटक केली.

या आरोपींकडून गुन्हयात चोरी केलेले ४,७५,००० रुपये किमतीचे ११५ ग्रॅम सोने व रोख रक्कम रुपये १,५३,२०० जप्त केले आहे. गुन्हा करताना वापरलेली हत्यारे लोखंडी कटावणी व पकड जप्त केली आहेत.

त्याचप्रमाणे मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात दाखल झालेल्या चेन स्नॅचींग गुन्हयाचा गुन्हे शाखा कक्ष-१ काशिमीरा यांनी तपास करून चैन स्नॅचींग करणारा मुख्य आरोपी जाफर गुलाब ईराणी ऊर्फ मुंडा यास अटक करुन त्याचेकडून २, ५५ हजार रुपये किमतीचे सोने व ८० हजार रुपये किंमतीच्या बुलेट व यामाहा या दोन मोटारसायकली जप्त केल्या आहेत. तसेच अटक आरोपी याने त्याचे इतर साथीदारासह काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत ३ गुन्हे, नवघर पोलीस ठाणे, कासारवडवली पोलीस ठाणे, कोनगांव पोलीस ठाणे, वालीव पोलीस ठाणे, माणिकपूर पोलीस ठाणे, कोंडवा पोलीस ठाणे , सायन पोलीस ठाणे या पोलीस ठाणे हद्दीत १० गुन्हे केल्याचे उघडकीस आले आहे.

अशाप्रकारे गुन्हे शाखा कक्ष-१ यांनी विविध गुन्हे उघडकीस आणुन अटक आरोपी यांचेकडून विविध गुन्हयातील एकूण ८,८३,२०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या कारवाईमुळे पोलीस प्रशासनाचे नागरिकांतून कौतुक होत आहे.

My Thane Edition
Dec 24, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in



साप्ताहिक

# मिड मॉर्निंग

₹2



MM अपने दम पर हर खबर...

● वर्ष: 16 ● डीजीटल अंक-20 ● ठाणे शनिवार, 24 दिसंबर 2022 ●


## DCP सुहास बावचे के मार्गदर्शन में पेल्हार पुलिस को मिली बडी कामयाबी




# मारपीट व लूट की घटना को अंजाम देने वाले 3 आरोपियों को 24 घंटे के अंदर किया गिरफ्तार

## आरोपियों की गिरफ्तारी के बाद 6 मामलों का हुआ खुलासा, 2 लाख से अधिक का मुद्देमाल बरामद


राजेश सिंह

+919699974686


**विरार।** मीरा-भाईंदर व वसई-विरार पुलिस आयुक्तालय के परिमंडल-3 का कार्यभार जबसे पुलिस उपायुक्त सुहास बावचे ने संभाला है, तबसे इस क्षेत्र में आपराधिक गतिविधियों पर तेजी से लगाम लगी है और इस क्षेत्र के पुलिसकर्मियों को आए दिन आपराधियों को पकडने में कामयाबी हासिल हो रही है। ऐसी ही एक बडी कामयाबी पेल्हार पुलिस स्टेशन के पुलिसकर्मियों को भी मिली है, जिन्होंने घटना के मात्र 24 घंटे के अंदर ही मारपीट व लूट के 3 आरोपियों को गिरफ्तार कर न सिर्फ इस मामले का खुलासा किया है, बल्कि साथ ही 6 अन्य मामलों का खुलासा करते हुए आरोपियों के पास से कुल 2 लाख 35 हजार 700 रुपये का मुद्देमाल बरामद किया है। मीरा-भाईंदर व वसई-विरार पुलिस आयुक्तालय द्वारा जारी प्रेस नोट के मुताबिक अजित जंगबहादुर यादव नामक एक शख्स ने गत 18 दिसंबर 2022 को पेल्हार पुलिस स्टेशन में अपने साथ हुई मारपीट व लूट की घटना की शिकायत दर्ज कराई थी। शिकायतकर्ता का कहना था कि 18 दिसंबर 2022 की दोपहर लगभग 3:30 बजे अपने घर जाने के लिए वह नालासोपारा फाटा से एक रिक्शे में बैठा और यह रिक्शा जब रिलायंस पेट्रोल पंप से 30 मीटर आगे मुंबई-अहमदाबाद महामार्ग-8 के सर्विस रोड पर पहुंचा, तब रिक्शा चालक व अंदर बैठे 2 अन्य लोगों ने उसके साथ गाली-गलौज करते हुए मारपीट शुरू कर दी और उसका मोबाईल, घडी व नकदी सहित कुल 14 हजार रुपये लूटने के बाद उसे रिक्शे से धक्का देकर बाहर गिरा दिया और फिर फरार हो गए। शिकायत दर्ज करने के बाद पेल्हार पुलिस ने इस मामले की जांच शुरू कर दी। इसी दौरान पुलिस को गुप्त सूचना मिली कि इस घटना से जुडे 3 आरोपी सातीवली स्थित तुंगारफाटा के पास मौजूद हैं, जिसके बाद पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखा के पुलिसकर्मियों ने पहुंचकर रवि गुप्ता (19) विवेक राय (22) व अमित पासवान (19) नामक 3 आरोपियों को धर दबोचा। आरोपियों से पूछताछ के दौरान ऐसे ही विभिन्न पुलिस स्टेशनों में दर्ज 6 अन्य आपराधिक मामलों का खुलासा हुआ और आरोपियों के पास से पुलिस ने 2 रिक्शा, 16 मोबाईल व नकदी सहित कुल 2 लाख 35 हजार 700 रुपये का मुद्देमाल बरामद किया। इस कार्रवाई को परिमंडल-3 के पुलिस उपायुक्त सुहास बावचे व सहायक पुलिस आयुक्त रामचंद्र देशमुख के मार्गदर्शन में पेल्हार पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक वसंत लब्दे, पुलिस निरीक्षक (गुन्हे) महेंद्र शेलार, पुलिस निरीक्षक (प्रशासन) अमर मराठे व गुन्हे प्रकटीकरण शाखा के पुलिस उपनिरीक्षक सनिल पाटील, पुलिस हवलदार योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, प्रताप पाचुंदे, पुलिस अमलदार संदीप शेळ्के, महसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, रोशन पुरकर व राहुल पवार ने अंजाम दिया।

# میرابھائندر، وسئی ویرار پولیس کمشنریٹ کے سبھی پولیس اسٹیشنوں میں ہر سنیچر کو شکایتوں کے ازالہ کا دن منایا جائے گا

میرا روڈ، (ساجد محمود شیخ): میرابھائندر وسئی ویرار پولیس کمشنریٹ کے سبھی پولیس اسٹیشنوں میں ہر سنیچر کو شکایتوں کے ازالہ کا دن منایا جائے گا۔ ہر سنیچر کو ۱۰ ر بجے سے ساڑھے ۱۱ ر بجے تک میرابھائندر وسئی ویرار کمشنریٹ کے سبھی پولیس اسٹیشنوں میں شکایتوں کے ازالہ کے دن زیادہ سے زیادہ افسران پولیس اسٹیشن میں موجود رہیں گے اور شکایت کنندگان کی شکایات کو پولیس اسٹیشن کے انچارج کے سامنے دور کیا جائے گا۔



میرابھائندر، وسئی ویرار پولیس کمشنریٹ کا دفتر۔

پولیس کی جانب سے جاری کردہ پریس نوٹ کے مطابق اس کا مقصد یہ معلوم کرنا ہے کہ شہریوں کی شکایات پر مناسب کارروائی کی گئی ہے اوران شکایت کنندگان کیلئے بھی جو پولیس اسٹیشن میں شکایت درج کروانے کے بعد مطمئن نہیں ہوتے، ان کی شکایت پر عملدرآمد کیا جائے۔ ڈویژنل اسسٹنٹ کمشنر آف پولیس بھی شکایتوں کے ازالہ والے دن اپنی حدود میں آنے والے پولیس اسٹیشنوں میں سے کسی ایک میں موجود رہیں گے اور شکایات کو نمٹانے میں شکایت کنندگان کی رہنمائی کریں گے۔ ڈپٹی پولیس کمشنر کو مندرجہ بالا سرگرمیوں پر باقاعدہ کنٹرول حاصل ہوگا۔ اسی طرح ڈپٹی پولیس کمشنر کے دفتر میں پیر سے جمعہ دوپہر ۳ ر بجے سے شام ۵ ر بجے تک دورہ کیا جاسکتا ہے تاکہ سرکل۔ ایک کے ان شکایت کنندگان کی شکایات کا ازالہ کیا جاسکے جن کی شکایتوں پر پولیس اسٹیشن میں تسلی نہیں ہوئی ہے۔ اس لئے اگر شکایت کنندگان پولیس اسٹیشن میں مطمئن نہیں ہوتے ہیں تو وہ متعلقہ ڈپٹی پولیس کمشنر سے شکایت کریں۔

کاشی میرا، نیا نگر، میرا روڈ، نوگھر، بھائندر اور اُتن کی حدود میں رہنے والے شکایت کنندگان ڈپٹی کمشنر آف پولیس لکشمی پارک، کانکیا روڈ میرا روڈ مشرق سرکل سے رابطہ قائم کرسکتے ہیں۔ وسئی، مانک پور، والیو، تولنج اور اچولے کی حدود میں رہنے والے ڈپٹی کمشنر آف پولیس سرکل۔ ۲ ر کے وسئی ریلوے اسٹیشن کے قریب ورتک کالج کے سامنے واقع دفتر سے رابطہ قائم کرسکتے ہیں۔ ویرار، ارنالہ، نالاسوپارہ، پیلہار اور مانڈوی پولیس اسٹیشنوں کی حدود میں رہنے والے وسئی نالاسوپارہ لنک روڈ پر وسنت نگری کے قریب واقع ڈپٹی کمشنر آف پولیس سرکل۔ ۳ ر کے دفتر سے رابطہ قائم کرسکتے ہیں۔

# 2 arrested within 48hrs of Navghar house break-in

**SURESH GOLANI**
MIRA-BHAYANDAR

Two men who broke into an apartment in the Cabin Road area of Navghar in Bhayandar (East) and decamped with valuables including cash, gold and silver ornaments amounting to more than Rs4.63 lakh were arrested from Dharavi within 48 hours by the crime branch unit (Zone I) of the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police. The incident took place when the family was visiting Shirdi.

The suspects – both history sheeters living in Kurla – have around 11 cases of house break-ins registered against them at various police stations in Mumbai. Apart from tools which were used to break open the locks of flats, the police have recovered a major part of the stolen booty including gold ornaments and Rs1.53 lakh in cash from the possession of the duo.

Not ruling on the possibility of more arrests and the involvement of the duo in more similar crimes, Deputy Commissioner of Police (crime) Avinash Ambure said, "The accused apparently conducted recces of the area and targeted locked houses. It's advisable to keep valuables and cash in bank lockers, especially while going out for trips."

THE FREE PRESS JOURNAL Sat, 24 December 2022 https://epaper.freepres